## पुनरूज्जीवनाचा कार्यकम

नैसर्गिक संपत्ती व संसाधने यांचे योग्य व चिरंजीवी व्यवस्थापन यांमधून ग्रामीण भागाची उन्नती साधण्याचे कार्य हरित पक्ष करणार आहे हे आपण पाहिलेच. त्याचबरोबर अवनत झालेल्या परिसंस्था व संसाधने यांचे पुनरूज्जीवन करण्याचा मोठाच कार्यकम हरित पक्ष हातांत घेईल. यामध्ये वैराण आणि पड जमिनीतील सुपीकतेचे पुनरूज्जीवन, हरत-हेची वने, - हरित वने, काष्ठ वने, काटेरी वने, - यांचे पुनरूज्जीवन, गवताळ प्रदेश, कुरणे व सॅव्हाना प्रदेश यांचे पुनरूज्जीवन, ओढे, नद्या यांचे प्रवाह, पात्रे, काठावरील प्रदेश, हायपो-हिक प्रदेश यांचे पुनरूज्जीवन, ओढे, नद्या यांच्याशी संबधित वनस्पतींचे पुनरूज्जीवन, जलमय भूमीचे पुनरूज्जीवन (वेटलॅन्डस् ), डोंगर - माथे व डोंगर- उतार यांचे पुनरूज्जीवन, असा हा मोठाच कार्यकम हातांत घेतला जाईल. यांमध्ये लाखो लोकांना रोजगार मिळेल, राष्ट्रीय संपत्तीत लक्षणीय भर पडेल आणि नैसर्गिकरीत्या मिळणा-या सुविधा यांचेही पुनरूज्जीवन होईल. उदाहरणार्थ, नैसर्गिकरीत्या तयार होणा-या सुपीक मातीच्या प्रकियांना चालना मिळणे, पाणी शुद्धिकरणाची नैसर्गिक किया पुन्हा कार्यान्वित होणे, वातावरणातील प्रदूषण कमी होणे, वैश्विक तापमान वाढीपासून बचाव होणे, वा-याने, पाण्याने, उष्णतेने होणारी जमिनीची धूप कमी होणे, जमिनीच्या ओलावा धरून ठेवण्याच्या शक्तीत वाढ होणे व परिसराची शुष्कता कमी होणे, मातीमधील सूक्ष्म जिवाणू, सूक्ष्म वनस्पती यांनी केलेल्या विघटनाच्या कियेस चालना मिळून शेतजमिनींची व इतर जमिनीची प्रत व कस सुधारणे, उपद्रवी कीटकांची, जिवाणूंची संख्या कमी होऊन उपकारक कीटकांची संख्या वाढणे व त्यांच्याकडून परागवहन, बीजवहन, किडीचा बंदोबस्त अशी कामे अधिक कार्यक्षमतेने होणे, वगैरे. यामुळे चालू पिढयांचेच नव्हे तर भावी पिढयांचेही भले होणार आहे.

## जनतेच्या हातांत पैसा

आज या सर्व कियांमध्ये बिघाड झाल्यामुळे त्या सुधारण्यासाठी वैयक्तिक शेतकरी, उद्योजक, व्यापारी, सर्वसामान्य जनता, तसेच शासकीय यंत्रणा यांना प्रचंड खर्च करावा लागतो. त्यामध्ये बचत होऊन योग्य शिक्षण, आरोग्य संवर्धन, स्पर्धात्मक खेळ व कीडा यांवर खर्चासाठी निधी उपलब्ध होईल. तसेच पुनरूज्जीवनाच्या मोठया कार्यकमामुळे सर्वसामान्य जनतेच्या हातांत पैसा उपलब्ध होईल आणि राष्ट्रातील संपत्तीचे वितरण सुधारून समाजातील विषमता कमी होईल. आज विकासामुळे विशिष्ट वर्गाच्या हातांत संपत्ती अधिकाधिक केंद्रित होत आहे आणि समाजात विषमता, हिंसा, गुन्हेगारी वाढत आहे. संपत्तीच्या अधिक योग्य वितरणामुळे यांस पायबंद बसेल. त्याचा शेती आणि उद्योग यांवरही परिणाम होऊन आज जे अनेक चैनीच्या, विलासाच्या, अनावश्यक गरजा भागविणा-या वस्तूंचे उत्पादन होत आहे, उदा. सौंदर्यप्रसाधने, शीतपेये, मद्य वगैरे, त्यासही खीळ बसेल व ती भांडवली गुंतवणूक योग्य शिक्षण, आरोग्यवर्धन व इतर सुविधा पुरविण्याकडे वळेल.

## नवी शिक्षणपद्धती

या सर्वांना आवश्यक व पूरक असणारी शिक्षणपद्धती विकसित करण्यावर हरित पक्ष जास्त भर देईल. आजच्या शिक्षणाचे प्रमुख उद्दिष्ट बाजारपेठेच्या व त्यावर अवलंबून असणा-या शहरांच्या आणि निर्यातीच्या नावाखाली परकीयांच्या गरजा भागविण्याकडे आहे. त्याऐवजी हे शिक्षण साधनसंपत्तीचे चिरंजीवी व्यवस्थापन, जैवविविधतेचे (नैसर्गिक आणि मानवनिर्मित) संरक्षण व जोपासना, पुनरूज्जीवनाचे तंत्र आणि मंत्र यांवर लक्ष केंद्रित करील व त्यासाठी आवश्यक असे तंत्रज्ञान विकसित केले जाईल. निसर्गसंपत्तीचे संरक्षण, संवर्धन, व बचत, तसेच मानवी कल्याण साधणा-या तंत्रज्ञानास हे शिक्षण प्राधान्य देईल.

**प्रकाश गोळे**